दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● बुधवार दि.२१ जानेवारी २०२६ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक १४८ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Wednesday 21 January 2026 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 148 ● Pages 4 ● Rate 4 Rs







# शिवसेना घाबरणारी पार्टी नाही त्यांनी त्यांचे नगरसेवक सांभाळावेत

## हॉटेलमधील नगरसेवकांच्या भेटीनंतर एकनाथ शिंदेंचा ठाकरेंना इशारा

**मुंबई (वृत्तसंस्था)**–मुंबईचा महापौर कोणाचा होणार? यावरून कमालीची गुप्तता आणि रस्सीखेच पाहायला मिळत आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी खबरदारीचा उपाय म्हणून आपल्या सर्व २९ नगरसेवकांना वांद्रे येथील 'ताज लँडस् एन्ड' या पंचतारांकित हॉटेलमध्ये हलवले आहे. आज त्यांनी या नगरसेवकांची भेट घेतली. त्यानंतर पत्रकारांशी शिंदेंनी संवाद साधला आहे.

शिवसेना घाबरणारी पार्टी आहे का? शिवसेनेला लोक घाबरतात. नवीन नगरसेवकांना आम्ही मार्गदर्शन करण्यासाठी हॉटेलमध्ये एकत्र ठेवले होते. ओळखी पाळखी, बोलणे-चालणे, काम कसे करायचे, जुने नगरसेवक कसे काम करत होते, त्यांचे अनुभव, निधीची तरतूद कशी करायची यावर आम्ही चर्चा केली. मला यांना भेटायचे होते. निवडणुकीत ते व्यस्त होते आणि इकडे जरा त्यांना वेगळा आनंद म्हणून हॉटेलमध्ये बोलावले होते, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

मुंबईत २९ नगरसेवक आम्ही निवडून आणले आहेत. जनतेचा हा आशीर्वाद आहे. लोकांनी आमचे काम स्वीकारले आहे आणि उबाठाचे नाकारले आहे. मुंबईचा महापौर महायुतीचा होईल. त्यांना त्यांची भीती आहे, त्यांनी त्यांचे नगरसेवक सांभाळून ठेवावेत, असे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

दरम्यान, मुंबई महानगरपालिकेत बहुमतासाठी आवश्यक ११४ हा आकडा गाठण्यासाठी भाजपकडे ८९ जागा असल्याने त्यांना एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेची मदत घेणे अपरिहार्य ठरले आहे. या स्थितीचा फायदा घेत शिंदे गटाकडून महापौरपदाचे अडीच-अडीच वर्षांचे सूत्र आणि स्थायी समितीसह अन्य महत्त्वाच्या समित्यांमध्ये प्रभावी प्रतिनिधित्वाची मागणी केली जाण्याची दाट शक्यता आहे. सत्तास्थापनेसाठी सुरू असलेल्या या अटी-शर्तींच्या राजकारणामुळे आणि संभाव्य वाटाघाटींमुळे मुंबईच्या राजकारणात मोठी उलथापालथ होण्याची चिन्हे दिसत असून, महायुतीमधील सत्तेचे हे समीकरण नेमके कसे जुळते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



# पलक सुरज सावंत यांची SSC GD अंतर्गत BSF मध्ये निवड

## कष्ट जिद्द आणि चिकाटीचे यशस्वी फळ

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील सावंत परिवारची सुन तथा परळी येथील बळवंत परिवाराची कन्या पलक सुरज सावंत यांची SSC GD ( staff Selection commition General Duty ) अंतर्गत इङ्कबॉर्डर सेक्यूरिटी फोर्स या सीमा सुरक्षा दला मध्ये निवड झाली आहे . यांच्या या घवघवीत यशामुळे पालवन चौक बीड येथील संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे .



पलक सुरज सावंत यांनी चिकाटीने आपले ध्येय डोळ्यासमोर ठेवत सातत्याने मेहनत घेतली कठोर शारीरिक सराव ,अभ्यासातील सातत्य तसेच मानसिक खंबीरपणा यांच्या बळावर त्यांनी SSC GD परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण करत इङ्कमध्ये स्थान मिळवले हि निवड म्हणजे केवळ वैयक्तिक यश नसून परिसरातील मुलींसाठी प्रेरणादायी ठरणारी आहे .

इङ्कहे देशाच्या सीमा सुरक्षेत अत्यंत महत्वाचे कार्य करणारे दल असून भारतातील सर्वात दुर्गम आणि कठीण भागात देशसेवा करण्याची जबाबदारी पार पाडते अशा प्रतिष्ठित दलामध्ये पलक यांचे पती सुरज कैलासराव सावंत जैसलमेर राजस्थान येथे कार्यरत असून त्यांच्या कडून प्रेरणा मार्गदर्शन घेऊन पलकने मेहनत घेतली . या यशात द्वारकादास मंत्री बँकेचे अधिकारी श्री कैलास सदाशिवराव सावंत (सासरे) यांची आणि त्यांचे कुटुंबीय यांची खंबीर साथ मिळाली . पलकची निवड होणे परळी वै आणि बीड च्या अभिमानाची बाब मानली जात आहे . त्यांच्या या यशामागे सावंत परिवार ' बळवंत परिवार सर्व नातेवाईक ' शिक्षक मार्गदर्शक आणि मित्र परिवार यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.या निवडीच्या पाश्वभूमीवर बीड भागात आणि परळी भागात आनंदोत्सवाचे वातावरण असून ग्रामस्थ 'सामाजिक कार्यकर्ते , शिक्षकवर्ग आणि मित्र परिवार यांनी पलक सुरज सावंत यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत . 'देशसेवेसाठी सदैव तत्पर राहून कुटुंबाचे नाव उज्वल करावे 'अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या .

पलक सुरज सावंत यांची ही यशोगाथा मेहनत , चिकाटी आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर कोणतेही स्वप्न साकार होऊ शकते याचा ठोस संदेश देणारी आहे . त्यांच्या पुढील कारकिर्दी साठी दैनिक महाराष्ट्र प्रतिमा परिवाराकडून मन:पुर्वक शुभेच्छा

# प्रकाशात चोऱ्यांच्या सत्राने व्यापारी भयभीत;कडक पोलीस गस्तीची मागणी

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

शहादा तालुक्यातील दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रकाशा गावात गेल्या काही दिवसांपासून चोरीच्या घटनांनी व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वाढत्या घरफोड्या व दुकानफोडीमुळे सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला असून, या पार्श्वभूमीवर प्रकाशा व्यापारी असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी शहादा पोलीस ठाण्याचे नवनियुक्त पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांची भेट घेऊन गावात कडक पोलीस गस्त वाढवण्याची मागणी केली आहे.



दि. १८ जानेवारीच्या मध्यरात्री चोरट्यांनी पुन्हा एकदा प्रकाशा गावाला लक्ष्य केले. मुख्य रस्त्यावरील एका दुकानासह एकूण दोन दुकानांचे कुलूप तोडून चोरांनी मोठे नुकसान केले. एकाच रात्री दोन ठिकाणी झालेल्या या धाडसी चोरीमुळे व्यापाऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली असून, पोलिसांच्या कार्यक्षमतेवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. व्यापाऱ्यांनी पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांच्याशी चर्चा करताना सांगितले की, प्रकाशा गावात यापूर्वीही अनेक मोठ्या चोरीच्या घटना घडल्या आहेत. मात्र, अद्याप एकाही प्रकरणाचा ठोस तपास लागलेला नसल्याने चोरांचे मनोबल वाढत असल्याची भीती व्यक्त करण्यात आली. तपास प्रलंबित राहिल्यामुळे व्यापारी वर्ग असुरक्षिततेची भावना अनुभवत आहे.या वेळी व्यापाऱ्यांनी रात्रीच्या वेळी पोलीस गस्त वाढवणे, बाजारपेठेतील बेशिस्त वाहतुकीवर नियंत्रण ठेवणे तसेच प्रलंबित चोरीच्या प्रकरणांचा तातडीने छडा लावून आरोपींना अटक करण्याची मागणी केली.यावेळी प्रकाशा व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष अंबालाल चौधरी यांच्यासह गावातील प्रमुख व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवनियुक्त पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांनी व्यापाऱ्यांच्या तक्रारी गांभीर्याने ऐकून घेत लवकरच ठोस कारवाई व गस्त वाढवण्याचे आश्वासन दिले आहे.

## भक्तराज कदम यांचे निधन

दैनिक वादळ वार्ता । **केज । प्रतिनिधी**



केज तालुक्यातील आनंदगाव येथील जेष्ठ नागरिक,सेवानिवृत्त कृषी सहाय्यक भक्तराज मोहन कदम वय ७० वर्ष यांचे सोमवार रोजी दि.१९ जानेवारी २०२६ सायंकाळी वृद्धापकाळाने निधन झाले.त्यांच्यावर कदमवस्ती येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांना दोन मुले, मुलगी,सून नातवंडे असा परिवार आहे.ते उद्योजक रवी कदम यांचे वडील होत.त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## वादळी कट्टा

फलकावर मोठी स्वप्नं, आत फीचा मळा,
ज्ञानाआधीच इथे पैशांचा वाढतो गळा.
यशाची हमी देत ठरवला जातो दर,
विद्यार्थ्यांच्या खिशावर बसतो रोजचा कर.

नोट्सचे डोंगर वाढती, समज मात्र कमी,
टेस्टच्या नावाखाली फिरते फीची जिमी.
वेळ जातो वाया, ताण भरतो मनात,
कोंचिंगच्या फेऱ्यात हरवतं बालपण हातात.

पालकांची घामाची कमाई झरते हळू,
एचखच्या ओझ्याखाली भविष्य होतं कळू.
मार्गदर्शन कमी, जाहिराती भारी,
शिक्षणाचा मुखवटा, आत लूटच सारी.

गुणांच्या शर्यतीत माणुसकी हरवली,
कोंचिंगच्या दुकानात विद्या विकली गेली.
शिक्षण धंदा झालं, मूल्य पडलं दूर,
या लुटीला थांबवणार कधी उठेल शूर?

संपादक
अजय भांगे



# राजोली गावातील घरकुल धारकांना शासन नियमाप्रमाणे तात्काळ रेती उपलब्ध करून द्या–अजिंक्य पाटील मारकवार



दैनिक वादळ वार्ता
**जिवती । प्रतिनिधी**

सर्वसामान्य माणसाचे घरकुलाचे स्वप्न पूर्ण व्हावे म्हनुन महाराष्ट्र शासनाने अनेक वेगवेगळ्या योजना राबवीत सर्वसामान्य माणसाला घरकुलाचा लाभ देऊन दिलासा दिला. पण घरकुल बांधकामात रेतीची मुख्य अडचण येत असल्यामुळे शासनाने यातून मार्ग काढीत प्रत्येक घरकुल धारकांस मोफत पाच ब्रास रेती देण्याचे धोरण जाहीर करून त्याची अंमलबजावणी तालुका प्रशासनावर सोपविली.पण अजूनही राजोली येथील ३६० घरकुल धारकांना रेती उपलब्ध न झाल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते अजिंक्य पा. मारकवार यांनी तहसीलदार मुलं यांची भेट घेत तात्काळ मोफत रेतीसाठी टीपी उपलब्ध करून देण्याची मागणी केली.

महाराष्ट्र शासनाने वेगवेगळ्या योजनेतर्गत सर्वसामान्य माणसाला त्याच्या घराचे स्वप्न पूर्ण करता यावे म्हनुन घरकुल योजना राबवून त्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला परंतु सदर बांधकामासाठी रेती उपलब्ध होत नसल्यामुळे शासनानाने मान्यताप्राप्त रेती घाटावरून प्रत्येक घरकुल धारकास मोफत पाच ब्रास रेती उपलब्ध करुंन देण्याचे धोरण जाहीर करून यांची जबाबदारी तालुका प्रशासनाकडे सोपवली पण अजूनही रेती मिळाली नसल्यामुळे घरकुलाचे बांधकाम रखडले आहे.तालुक्यातील रेती घाटातून रोज मोट मोठया हायवा गाड्यानी रेती वाहतूक होत असताना घरकुल लाभार्थीना रेती उपलब्ध करून देण्यात प्रशासनाला कोणती अडचण येत आहे असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकाकडून विचारला जात आहे.

या घरकुल लाभार्थीना होणारी अडचण लक्षात घेऊन राजोली येथील शिष्टमंडळाने अजिंक्य पा. मारकवार याच्या नेतृत्वाखाली तहसीलदार मुल यांची भेट घेऊन तात्काळ घरकुल लाभार्थ्यांना रेती देण्याची मागणी केली. यावेळी शिष्टमंडळात माजी ग्रामपंचायत सदस्य पुरुषोत्तम धारणे,प्रकाश गोडे, रवी नन्नावरे, हितेश दडमल आणि राजोली येथील नागरिक उपस्थित होते.

# नंदुरबार जिल्ह्यात विना हेल्मेट दुचाकीस्वारांची खैर नाही; पोलीस अधीक्षकांचे कडक कारवाईचे संकेत

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी.**

प्रतिनिधी जिल्ह्यात रस्ते अपघातांचे वाढते प्रमाण आणि त्यामध्ये होणारी जीवितहानी रोखण्यासाठी नंदुरबार जिल्हा पोलीस दल आता क्शन मोडवर आले आहे. दुचाकीस्वारांच्या सुरक्षिततेसाठी विना हेल्मेट वाहन चालवणाऱ्यांवर अत्यंत कडक कारवाई करण्याचे स्पष्ट संकेत जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस. यांनी दिले आहेत. विशेष म्हणजे, आता दुचाकी चालकच नव्हे तर मागे बसणाऱ्या प्रवाशानेही हेल्मेट घालणे अनिवार्य असणार आहे.पोलीस प्रशासनाने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार, जिल्ह्यात अपघातांचे प्रमाण दरवर्षी वाढत आहे:

सन २०२४: एकूण १६९ अपघातांत १९२ नागरिकांचा मृत्यू झाला.

सन २०२५: अपघातांची संख्या १८५ वर पोहोचली असून, तब्बल २०२ नागरिकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत.

या वाढत्या मृत्यूदरामुळे पोलीस प्रशासन अधिक सतर्क झाले असून, रस्ते सुरक्षा नियमांची अंमलबजावणी कठोरपणे करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणे आणि शहर वाहतूक शाखेच्या वतीने संपूर्ण जिल्ह्यात विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे. मोटार वाहन कायद्यानुसार हेल्मेट न वापरणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईसह कायदेशीर पावले उचलली जातील.



**स्वत:च्या आणि कुटुंबाच्या सुरक्षिततेसाठी दुचाकी चालवताना नेहमी प्रमाणित हेल्मेटचा वापर करावा. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांची आता गय केली जाणार नाही. नागरिकांनी पोलीस दलास सहकार्य करून नियमांचे पालन करावे.**
**– श्रवण दत्त. एस. जिल्हा पोलीस पोलीस अधीक्षक नंदुरबार**

चालकासह मागे बसणाऱ्या व्यक्तीलाही हेल्मेट आवश्यक.वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यास कोणतीही सूट मिळणार नाही.केवळ दंड करणे हा उद्देश नसून जीव वाचवणे हा मुख्य हेतू आहे.

# संपादकीय

## कोकणात महायुतीची मोर्चेबांधणी...!

कोणत्याही निवडणुका लढविण्यासाठी आवश्यक असते ते कार्यकर्त्यांचे पाठबळ. महाविकास आघाडीकडे कार्यकर्तेच दिसत नाहीत आणि उरलेही नाहीत. शेवटी सत्तेच्या विरोधात किती काळ विरोधी पक्षाची भूमिका घेऊन उभं राहायचं, असा प्रश्न कार्यकर्त्यांना सातत्याने संभ्रमित करतो. याच संभ्रमावस्थेत कोकणातील महाविकास आघाडी मुंबईसह राज्यातील विविध महानगरपालिका निवडणुकीत दुभंगली आहे. पार पडलेल्या निवडणुकीत 'एकला चलो रे'चा नारा देत महाविकास आघाडीतील घटक पक्षांची वाटचाल सुरू असल्याने साहजिकच या निवडणुकीत कोकणात तरी भाजप, शिवसेना(शिंदे) गट, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवारगट) आरपीआय या घटक पक्षांच्या महायुतीसमोर आव्हान उभे करण्याची मानसिकता महाविकास आघाडीमध्ये नाही. त्या तुलनेत महायुतीच्या मोर्चेबांधणीने कमालीचा वेग घेतला आहे.महाराष्ट्रातील महानगरपालिकांच्या निवडणुकीचे निकाल भारतीय जनतापक्ष, शिवसेना महायुतीच्या बाजूने लागले आहेत. महानगरांच्या निकालात राज्यातील शहरी जनतेचा कौल महायुतीच्या बाजूने लागलेला असताना आता राज्यात पहिल्या टप्प्यातील ५ जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकांचे बिगुल वाजले आहे. त्यामुळे आता जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीच्या तयारीला, मोर्चेबांधणीला सुरुवात झाली आहे. राज्यातील कोकण भागात झालेल्या नगरपालिका, नगरपंचायत निवडणुकीतही कोकण महायुतीच्यासोबत राहिले आहे. कोकणामधील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर या जिल्ह्यांमध्ये महायुतीच्या माध्यमातून निवडणुका होतील असे अपेक्षित आहे.

रायगड जिल्ह्यात महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवारगट) व शिवसेना (शिंदेगट) यांच्यात विळ्या-भोपळ्याचे सख्य आहे. त्याला नुकत्याच पार पडलेल्या नगरपालिका निवडणुकीतील संघर्षाचीही किनार आहे. त्यामुळे शिवसेनेचे मंत्री भरतशेठ गोगावले आणि राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांचे अजिबात पटत नाही. त्यामुळे रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदावरून नेहमीच कळीचा मुद्दा उपस्थित होत असतो. खा. सुनील तटकरे आणि रायगडातील सेनेचे आमदार एकत्र येतील अशी आजच्या क्षणाला जरी शक्यता धूसर असली तरीही एकूणच राज्यातील महायुतीचा माहोल पाहता रायगड जिल्हा परिषद निवडणुकीतही युती होऊ शकते किंवा मैत्रीपूर्ण लढतही होऊ शकेल. जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक म्हणजे मिनी विधानसभा म्हटली जाते. जरी विधानसभा निवडणूक २०२९ मध्ये म्हणजे आणखी तीन वर्षांनी होणार असल्या तरीही जिल्हा परिषद, समिती निवडणुकीत सर्वसामान्य कार्यकर्ता आपल्या भागात कार्यकर्त्यांचे संघटन करत असतो. त्यामुळे जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुका या पक्षीय संघटनात्मक दृष्ट्याही महत्त्वाच्या मानल्या जातात. त्यामुळेही या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांना मोठं महत्त्व प्राप्त झालेलं असते. रत्नागिरी - सिंधुदुर्ग जिल्ह्यात भारतीय जनता पक्ष, शिवसेना शिंदेगट यांची युती होऊ शकते. सोबत राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय देखील असेलच. तसे पाहता महायुतीची मोर्चेबांधणी गेले दोन दिवस कोकणात सुरू झाली आहे. महायुतीच्या माध्यमातून निवडणुकांना सामोरे गेल्यास निवडणुकीत चांगले यश मिळू शकते. त्यामुळेच कोणत्याही स्थितीत युती करण्याच्या निर्णयावर महायुतीतील घटक पक्षांमध्ये एकमत झालं आहे. दुसरीकडे महाविकास आघाडीतील घटकपक्ष असलेल्या राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवारगट आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या घटकपक्षांचा समावेश असलेल्या महाविकास आघाडी आजही पराभवाच्या धक्क्यातून सावरलेली नाही. नगरपालिका निवडणुकीत कोकणात महाविकास आघाडी कुठे दिसलीच नाही. शहरी भागात महाविकास आघाडीची ही अशी अवस्था झाली आहे. हे कमी म्हणून की काय राज्यातील निवडणूक निकालानेही महाविकास आघाडीत काहीशी संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. महाविकास आघाडीतील घटकपक्षांमध्ये समन्वयाचा अभाव आहे. त्याचबरोबर निवडणुकीपुरते कार्यकर्ते लोकांसमोर जातात. इतरवेळी कार्यकर्ते कुठे दिसतच नाहीत. कोकणात उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून कार्यकर्त्यांना पक्षीय काम करावेसे वाटेल अशी कोणतीही उत्साहवर्धक स्थिती नाही. त्यामुळेच कोकणात मागे पार पडलेल्या निवडणुकीत महाविकास आघाडी कुठे दिसलीच नाही. त्यामुळे जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत उतरण्याची मानसिकताही महाविकास आघाडीकडे नाही. कोकणात काही भागात महाविकास आघाडीतील काही मोजके कार्यकर्ते स्वत: कार्यरत असल्याने ते या निवडणुकीत निवडणूक लढविण्यासाठी प्रयत्न करतील. महाविकास आघाडीकडे कार्यकर्त्यांचे आवश्यक असणारे बळ नसल्याने त्यांचा फारसा प्रयत्न असणार नाही. कोकणातील चारही जिल्ह्यात राष्ट्रीय काँग्रेस पक्षाची ताकद अगदीच क्षीण होत चालली आहे. नगरपालिका निवडणुकीत राजापूर नगरपालिकेत जे यश कॉंग्रेसला मिळाले ते यश कॉंग्रेस पक्षाचे नव्हे, तर ते यश हे राजापूर नगरपालिकेत नगराध्यक्ष म्हणून निवडून आलेल्या ॲड. हुस्नबानो खलीफे यांचेच आहे. वैयक्तिक स्तरावर नगराध्यक्ष खलिफे यांचा जो जनसंपर्क राहीला त्यामुळे एकीकडे कोकणात चित्र वेगळे असताना मात्र राजापूरला ॲड. खलीफे या निवडणुकीत यश मिळवू शकल्या.त्या-त्या जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांपुरते पक्षाचे अस्तित्व राहीलं आहे. उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडे कोणाचा पायपोस कुणाचा नाही, अशी स्थिती आहे.कोणत्याही निवडणुका लढविण्यासाठी आवश्यक असते ते कार्यकर्त्यांचे पाठबळ. महाविकास आघाडीकडे कार्यकर्तेच दिसतही नाहीत आणि उरलेही नाहीत. शेवटी सत्तेच्या विरोधात कितीकाळ विरोधी पक्षाची भूमिका घेऊन उभं रहायचा असा प्रश्न कार्यकर्त्यांना सातत्याने संभ्रमित करतो. याच संभ्रमावस्थेत कोकणातील महाविकास आघाडी मुंबईसह राज्यातील विविध महानगरपालिका निवडणुकीत दुभंगली आहे. पार पडलेल्या निवडणुकीत 'एकला चलो रे'चा नारा देत महाविकास आघाडीतील घटक पक्षांची वाटचाल सुरू असल्याने साहजिकच या निवडणुकीत कोकणात तरी भाजप, शिवसेना(शिंदे) गट, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवारगट) आरपीआय या घटक पक्षांच्या महायुतीसमोर आव्हान उभे करण्याची मानसिकता महाविकास आघाडीमध्ये नाही. यामुळेच जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत महायुती कोकणात निवडणुकीची जी मोर्चेबांधणी करीत आहे. ती यशस्वी होणारी आहे.रायगड जिल्ह्यात थोडफार प्रमाणात महाविकास आघाडीतील शेतकरी कामगार पक्ष निवडणुकीत दिसू शकेल. येत्या दोन-तीन दिवसात कोकणातील राजकीय चित्र अधिक स्पष्ट होईल.

# चौलमध्ये जनसागर उसळला! आढावा बैठकीने विरोधकांची झोप उडवली

दैनिक वादळ वार्ता
**अलिबाग । प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात जिल्हापरिषद व पंचायत समिती निवडणुकांचे बिगुल वाजताच चौल मतदारसंघात राजकीय वातावरण तापले आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे लोकप्रिय उमेदवार सुरेंद्र म्हात्रे यांनी चौल तुलाडदेवी येथे रविवारी (दि. १८ जानेवारी) घेतलेल्या सर्वपक्षीय आढावा बैठकीने संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष वेधून घेतले. या बैठकीला जनतेची तोबा गर्दी पाहायला मिळाली. ही अभूतपूर्व उपस्थिती म्हणजेच सुरेंद्र म्हात्रे यांची वाढती लोकप्रियता असून, हीच गर्दी पाहून विरोधकांची झोप उडणे अटळ आहे, असे ठाम वक्तव्य त्यांनी केले.या महत्त्वपूर्ण बैठकीस शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील, विजय चौलकर, मधुकर फुंडे, सुरेश खोत, निलेश खोत, शरयू स्वप्नील अधिकारी यांच्यासह कार्यकर्ते, काँग्रेसचे तालुका प्रमुख भास्कर चव्हाण, आशिष गोंधळी, महेंद्र पाटील यांच्यासह कार्यकर्ते, शिवसेनेचे अशोक नाईक, विनायक म्हात्रे, सूरज म्हात्रे, निलेश म्हात्रे




यांच्यासह असंख्य कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी बोलताना सुरेंद्र म्हात्रे यांनी विरोधकांवर प्रखर शब्दांत हल्लाबोल केला. खोटी आश्वासने देणे, आधीच झालेली कामे नव्या स्वरूपात दाखवून ग्रामस्थांची दिशाभूल करणे, ३०० कोटींचा निधी आणल्याचे हवेतले दावे करून जनतेला स्वप्ने दाखवणे, असे प्रकार विरोधक सातत्याने करत असल्याचा आरोप त्यांनी केला. पैशांचा महापूर दाखवून फोडाफोडीचे राजकारण, खोटी टेंडरिंग आणि जनतेची फसवणूक सुरू आहे, आणि म्हणूनच ही निवडणूक आपल्या अस्तित्वाची लढाई असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ही निवडणूक आपल्याला जिंकलीच पाहिजे या निर्धाराने प्रत्येक कार्यकर्त्याने कामाला लागावे, असे आवाहनही त्यांनी केले.कोविडसारखी महाभयंकर महामारी, निसर्ग चक्रीवादळ आणि त्यात चौल परिसराचे १०० टक्के नुकसान झाले असताना, चौलचा बागायतदार पूर्णपणे उध्वस्त झाला होता. त्या कठीण काळात आमदार आणि विरोधक कुठे होते? असा थेट सवाल उपस्थित करत, ती वेळ जनता विसरलेली नाही, अशी घणाघाती टीका सुरेंद्र म्हात्रे यांनी केली.दरम्यान, बैठकीत बोलताना शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांनीही स्पष्ट आणि आक्रमक भूमिका मांडली. टक्केवारीत काम करणारे आम्हाला नकोत. यापूर्वी शेतकरी कामगार पक्षाचे आमदार होते, पण आम्ही कधीही टक्के घेऊन काम केले नाही. मात्र चूक तुमचीही आहे आणि आमचीही आहे; आम्हीच आमदार मोठा केला. आजपर्यंत त्या आमदाराने विधिमंडळात जनतेचे प्रश्न मांडले नाहीत, असा स्पष्ट आरोप त्यांनी केला. लोकशाही जिवंत ठेवायची असेल, तर या गद्दारांना गाडावेच लागेल. सुरेंद्र म्हात्रे यांना प्रचंड मतांनी निवडून देणे हाच एकमेव मार्ग आहे. सुरेंद्र म्हात्रे हे फक्त शिवसेनेचे उमेदवार नाहीत, ते शेतकरी कामगार पक्षाचे आणि काँग्रेसचेही उमेदवार आहेत, असे समजून प्रत्येकाने काम करावे, असे ठाम विधान जयंत पाटील यांनी केले.चौलमध्ये झालेल्या या आढावा बैठकीने निवडणूक रणधुमाळीला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली असून, जनतेचा वाढता पाठिंबा पाहता विरोधकांचे आव्हान अधिकच कठीण झाले आहे.

# ठाणे पोलिसांनी अंमली पदार्थ विक्री करणारे आंतरराज्यीय रॅकेट केले उघड

दैनिक वादळ वार्ता
**ठाणे । प्रतिनिधी**

मुंब्रा पोलीस स्टेशन, ठाणे शहर चे हद्दीत अंमली पदार्थाची विकी व सेवन करणा-यांवर कठोर कारवाई करणेबाबत वरिष्ठ. पो. निरी. श्री. अनिल शिंदे यांनी मुंब्रा पोलीस स्टेशनचे एन.डी.पी.एस पथकातील अधिकारी व अंमलदार यांना आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने मुंब्रा पोलीस स्टेशनकडील सपोनि/केदार, सपोनि/जाधव यांना प्राप्त माहितीनुसार बिलाल हॉस्पिटलजवळ करण्यात आलेल्या सापळा कारवाईदरम्यान आरोपीत नामे बासु उमरदीन सय्यद रा. मुंब्रा याचे ताब्यात २३.५ ग्रॅम वजनाचा मोफेड्रीन (एम.डी) पदार्थ मिळुन आल्याने आरोपीताविरोधात गु.र.क्र. ।। ४६/२०२६ एन.डी.पी.एस ॲक्ट कलम ८ (क), २२ (ब), २९ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात येवुन लागलीच पुढील तपासाची सुत्रे फिरवुन मध्यप्रदेश येथुन एम.डी अंमली पदार्थ विकी करिता दोन इसम येणार असल्याची खात्रीशीर माहिति अटक आरोपीताने तपासादरम्यान दिल्याने त्यासुनषंगाने करण्यात आलेल्या कारवाईत आरोपीत नामे रामसिंग अमरसिंग गुज्जर वय-४० वर्षे रा. मध्यप्रदेश व ३) कैलास शंभुलालजी बलई वय-३६ वर्षे, रा. मध्यप्रदेश यांना अटक करण्यात आली असुन आरोपीतांचे ताब्यातुन ०३ किलो ५१५ ग्रॅम वजनाचा रू. ७,३०,५७,७५०/- एकुण किंमतीचा मोफेड्रीन (एम.डी) जप्त करण्यात आला आहे.नमुद आरोपीतांकडे पोलीस कोठडीदरम्यान करण्यात आलेल्या चौकशीमध्ये सदरचा अंमली पदार्थ आरोपीत यांनी मध्यप्रदेश राज्य येथुन पाहिजे आरोपीतांनी विक्रीकरिता दिला असलेबाबत सांगितल्याने लागलीच सपोनि/केदार, सपोनि / जाधव,



पोउपनि/दळवी व पथकाने जि. रतलाम, राज्य-मध्यप्रदेश येथे जावुन केलेल्या कारवाईमध्ये आरोपीत नामे मनोहर लाल रंगलाल गुर्जर व राजु उर्फ रियाजमोहम्मद सुलतानमोहम्मद मंसुरी यांना शिताफीने ताब्यात घेवुन त्यांचे कब्जातुन एकुण ०९ किलो ९५६ ग्रॅम वजनाचा रू. १९,९१,२०,०००/- किंमतीचा मेफेड्रॉन (एम.डी) हा अंमली जप्त करण्यात आला असुन नमुद आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. तसेच पाहिजे आरोपीतांचा शोध घेण्यात येत आहे.मुंग्र पोलीस स्टेशन येथे वरीलप्रमाणे दाखल गुन्हयात आजपावेतो ०५ आरोपीतांना अटक करण्यात आली असुन त्यांचे ताब्यातुन एकुण १३ किलो ६२९.५ ग्रॅम वजनाचे (एम. डी) अंमली पदार्थ जप्त करण्यात आले.

# सीसीटीव्हीच्या आधारे कर्जत रेल्वे स्थानकावर मोबाईल चोर पोलीसांच्या ताब्यात

दैनिक वादळ वार्ता
**कर्जत । प्रतिनिधी**

कर्जत रेल्वेस्थानकावर प्लॅटफॉर्म क्रमांक एकवर झोपेत असताना प्रवाशाचा मोबाईल चोरण्याचा प्रकार घडला होता. याचा कर्जत रेल्वे पोलीस ठाण्याच्या गुन्हे तपास पथकाने सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने काही दिवसांत उलगडा केला आहे.दहिसर पूर्व, मुंबई येथील रहिवासी गणेश कालिदास कवठे (वय २३, व्यवसाय हॉटेल कामगार) यांनी याबाबत तक्रार दाखल केली होती. कर्जत स्थानकावरील स्टेशन मास्तर कार्यालयाजवळील बाकड्यावर बसले असताना त्यांना झोप लागली. याचवेळी अज्ञात चोरट्याने त्यांच्या पॅन्टच्या खिशातून टेक्नो कंपनीचा मोबाईल चोरून नेला. याबाबत कर्जत रेल्वे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.तपासात पोलिसांनी रेल्वे स्थानकावरील सीसीटीव्ही फुटेज व गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार आरोपी दहिवली, तालुका कर्जत परिसरात राहत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी इंदिरानगर, गणपती मंदिराजवळील परिसरातून नयनेश उर्फ पिंट्या अरुण शिंदे (वय ४०, रा. दहिवली, ता. कर्जत, जि. रायगड) याला



ताब्यात घेतले. व चोरीस गेलेला सुमारे १५ हजार रुपये किमतीचा मोबाईल जप्त करण्यात आला. तसेच सदर गुन्हा आपणच केल्याची कबुली आरोपीने दिल्यानंतर त्याला अटक करण्यात आली आहे. या आरोपीवर यापूर्वीही कर्जत शहर पोलीस ठाणे आणि खालापूर पोलीस ठाण्यात चोरीचे गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

तपास मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्त, उपायुक्त व सहाय्यक पोलीस आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच कर्जत रेल्वे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक तानाजी खाडे यांच्या नेतृत्वाखाली पोउपनिरीक्षक प्रविण कड, पो. हवा प्रवीण कांबळे, पो हवा राजेंद्र बागुल ,प्रशांत गोडे, पो ना सचिन चव्हाण, पो शि नितीन मोहिते , पो शि प्रल्हाद चोरमले, कोणी अक्षय पेरणेकर, पो शि - निकेश तुरडे, पो शि जाधव,कर्जत रेल्वे पोलीस ठाणे पथकाने कामगिरी बजावली आहे.

# खडकीत भाजपची निवडणूक तयारी जोमात राहुल कुल यांच्या उपस्थितीत संवाद बैठक

दैनिक वादळ वार्ता
**खडकी । प्रतिनिधी**

आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाची महत्त्वपूर्ण निवडणूक संवाद बैठक खडकी येथे पार पडली. या बैठकीस आमदार राहुल कुल यांच्यासह वासुदेव नाना, तालुक्यातील ज्येष्ठ नेते, पदाधिकारी तसेच इच्छुक उमेदवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.या बैठकीत जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या विविध गणांमधील राजकीय परिस्थिती, पक्ष संघटन मजबूत करण्याबाबत चर्चा करण्यात आली. प्रत्येक गावातील कार्यकर्त्यांनी स्थानिक प्रश्न, विकासकामे, तसेच मतदारांच्या अपेक्षा मांडल्या. त्यावर मार्गदर्शन करताना आमदार राहुल कुल यांनी आगामी निवडणुकांमध्ये एकजुटीने व शिस्तबद्ध पद्धतीने काम करण्याचे आवाहन केले.



भाजप हा विकासाचा आणि विश्वासाचा पक्ष आहे. केंद्र व राज्य सरकारच्या योजना तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी कार्यकर्त्यांनी प्रभावीपणे काम करावे, असे मत आमदार राहुल कुल यांनी व्यक्त केले. तसेच योग्य उमेदवार निवड, संघटनात्मक ताकद आणि जनतेशी थेट संवाद यावर भर देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.या संवाद बैठकीस तालुक्यातील विविध गावांमधील जिल्हा परिषद व पंचायत समिती गणातील सदस्य, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि पक्षाचे समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. खडकी येथील कार्यालय परिसरात उत्साही वातावरण पाहायला मिळाले. या बैठकीनंतर कोणाला जिल्हा परिषद व पंचायत समितीचे तिकीट मिळणार, याबाबत कार्यकर्त्यांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. इच्छुक उमेदवारांची नावे, पक्षाची अधिकृत भूमिका आणि संभाव्य उमेदवारांबाबत गणागणात चर्चा रंगू लागल्या आहेत. कोण होणार जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य, कोणाला तिकिट मिळणार याकडे सर्व कार्यकर्त्यांचे लक्ष लागून राहिले आहे.या बैठकीमुळे आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी भाजपची तयारी अधिक भक्कम झाल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून आले.

# एटापल्ली येथे खनिज निधीतील विविध विकासकामांची जिल्हाधिकारी यांचाकडून प्रत्यक्ष पाहणी महिला बचत गटांच्या उपक्रमांना प्रोत्साहन

## शासनाकडून सहकार्याचे आश्वासन कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्राच्या कामात दिरंगाईबाबत बांधकाम विभागावर नाराजी

**दैनिक वादळ वार्ता**
**आरमोरी । प्रतिनिधी**

जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधी अंतर्गत एटापल्ली तालुक्यात सुरू असलेल्या विविध विकासकामांची जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी काल प्रत्यक्ष पाहणी केली. या दौऱ्यादरम्यान दुर्गम भागातील महिला बचत गटांमार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे त्यांनी विशेष कौतुक करत शासनाकडून आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

या तालुका दौऱ्यात जिल्हाधिकाऱ्यांनी मौजा जीवनगट्टा येथे महिला सक्षमीकरणाला चालना देणाऱ्या आळिंबी (मशरूम) उत्पादन उपक्रमास भेट देऊन पाहणी व मार्गदर्शन केले. जय पेरसापेन महिला बचत गटासह एकूण सहा महिला बचत गटांमार्फत उभारण्यात आलेल्या आळिंबी उत्पादन युनिटची पाहणी करताना त्यांनी उत्पादन प्रक्रिया, क्षमता व विक्री संधींचा सविस्तर आढावा घेतला. सर्व युनिट्सची उभारणी पूर्ण होऊन प्रत्यक्ष उत्पादन सुरू असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. ग्रामीण व दुर्गम भागातील




महिलांसाठी हा उपक्रम प्रेरणादायी असून यामधून नियमितपणे आर्थिक उत्पन्नाचा मार्ग खुला होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

दौऱ्यादरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी जीवनगट्टा येथील आदिवासी लक्ष्मी महिला बचत गट केंद्रास भेट देऊन मोहफुलांपासून तयार होणाऱ्या विविध उत्पादनांची पाहणी केली. तसेच धिंगरी आळिंबी उत्पादन व विक्री केंद्रास भेट देत महिलांशी संवाद साधून बाजारपेठ जोडणी, मूल्यवर्धन व विक्री वाढीबाबत मार्गदर्शन केले. यावेळी महिला बचत गटाच्या अध्यक्षा सौ. वंदना गावडे यांनी बचत गटामार्फत मोहाचे लाडू, ज्वारीचे लाडू तसेच विविध पौष्टिक पदार्थ तयार करून देशभर विक्री केली जात असल्याची माहिती दिली.

यानंतर बायफ मित्र संस्था, एटापल्ली येथील मत्स्यपालन संस्थेस भेट देऊन मत्स्यपालन साहित्याचे वितरण करण्यात आले. मौजा डुम्मे येथे डीएमएफ निधीतून मंजूर इंधन विहिरीची प्रत्यक्ष लाभार्थ्यांच्या शेतात पाहणी करण्यात आली. तसेच मौजा जवेली (म.) येथे शेतकरी श्रीमती हर्षा सुंदरशहा कुमरे यांच्या कुक्कुटपालन केंद्रास भेट देऊन उपक्रमाची प्रगती तपासण्यात आली.

कौशल्य विकास केंद्र उभारणीच्या दिरंगाईबाबत नाराजी एटापल्ली येथे खनिज निधीतून उभारण्यात येत असलेल्या नवीन कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्राच्या सुरू असलेल्या बांधकामाची पाहणी करताना जिल्हाधिकाऱ्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामकाजाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. प्रशासकीय मान्यता मिळूनही व निधी उपलब्ध असूनही बांधकाम वेळेत सुरू न केल्याचे निदर्शनास आले. याबाबत संबंधित कार्यकारी अभियंता यांना कारणे दाखवा नोटीस बजावून पुढील कारवाईचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. विकासकामांमध्ये दिरंगाई व निष्काळजीपणा सहन केला जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

दौऱ्याच्या शेवटी उपविभागीय कार्यालय, एटापल्ली येथे तालुकास्तरीय यंत्रणेमार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने व ठरविलेल्या कालमर्यादेत कामे पूर्ण करावीत, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

यावेळी उपविभागीय अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी अमर राऊत, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीमती प्रीती हिरळकर, जिल्हा खनिकर्म अधिकारी डॉ. इब्रान शेख, तहसीलदार हेमंत गांगुर्डे, गट विकास अधिकारी डॉ. आदिनाथ आंधळे, तालुका कृषी अधिकारी अरुण वसवाडे, एच. के. राऊत, समीर पेदापल्लीवार यांच्यासह विविध शासकीय अधिकारी-कर्मचारी, महिला बचत गटांच्या सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# अक्कलकुव्यात एकाच रात्री पाच ठिकाणी घरफोडी; २.८१ लाखांचा मुद्देमाल लंपास



**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार । दिपक गोसावी**

अक्कलकुवा शहरात सराईत चोरट्यांनी धाडसाची परिसीमा गाठत एकाच रात्री पाच वेगवेगळ्या ठिकाणी घरफोडी करून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण केले आहे. कोठलाफळी, पोलीस वसाहत आणि ग्रामीण रुग्णालय कर्मचारी वसाहत या परिसरांमध्ये झालेल्या चोरीत रोख रक्कम व सोन्या-चांदीचे दागिने असा सुमारे २ लाख ८१ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास झाला आहे.

चोरट्यांनी कटर मशीन व टामीसारखी अत्याधुनिक साधने वापरून घरांचे कडी-कोंडे तोडल्याने ही सराईत टोळी असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. कोठलाफळीतील बहादूरसिंग पाडवी यांच्या घरातून मोठ्या प्रमाणावर रोख रक्कम व दागिने चोरीस गेले. अन्य ठिकाणीही घरफोडी व चोरीचा प्रयत्न झाल्याचे उघडकीस आले आहे.

घटनेची गंभीर दखल घेत अक्कलकुवा पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली असून, श्वान पथक व फॉरेन्सिक तज्ज्ञांच्या मदतीने पुरावे गोळा करण्यात आले आहेत. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा शोध सुरू असून, शहरात रात्रीची पोलीस गस्त वाढवण्यात आली आहे. नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

---

# वडगाव ढोक येथे श्री शाहीर मोहन आविळे व त्यांच्या पत्नी यांचा गावकऱ्यावतीने सत्कार व होलार समाज दिनदर्शिकाचे प्रकाशन संपन्न



**दैनिक वादळ वार्ता**
**गेवराई । प्रतिनिधी**

वडगाव ढोक तालुका गेवराई येथील प्रसिद्ध विद्रोही शाहीर श्री मोहन आविळे व त्यांच्या पत्नी या दांपत्याचा गावकऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला व होल्हार समाज दिनदर्शिका प्रकाशन गावकरी मंडळांच्या वतीने करण्यात आले. सविस्तर वृत्त असे की प्रथम थोर स्वातंत्र्य सैनिक विदा आविळे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. वडगाव ढोक येथील विद्रोही शाहीर यांनी ठाणे येथे पार पडलेल्या होलार समाज मेळाव्यामध्ये बीड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केले श्री शाहीर मोहन आविळे व त्यांच्या विविध पत्नी यांनी ठाणे येथे संपन्न झालेल्या होलार समाज मेळ्यामध्ये बीड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करून आपल्या जिल्ह्याचा आवाज संपूर्ण महाराष्ट्रामध्ये पोहोचवला अशा या शाहिरांचा सत्कार वडगाव ढोक गावकरी मंडळींच्या वतीने आज करण्यात आला व होलार समाज दिनदर्शकेचे प्रकाशन ही गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले. यावेळी चळवळीमध्ये काम करणारे गावातील युवक गावकरी मंडळी महिला समाजवाद मोठ्या संख्येने उपस्थित होते

---

# अन्न औषध प्रशासनाने घेतली ग्राहक पंचायत महाराष्ट्र यांच्या निवेदनाची तात्काळ दखल-अनिल बोर्डे

**दैनिक वादळ वार्ता**
**गेवराई । प्रतिनिधी**

दैनंदिन जीवनात व सणासुदीच्या काळात खाद्यपदार्थ, दुग्ध पदार्थ, खाद्यतेले, आदीची मोठ्या प्रमाणात मागणी होत असते. खाद्यपदार्थांमध्ये मोठ्या प्रमाणात भेसळ होण्याची शक्यता असते. भेसळयुक्त पदार्थामुळे मानवी आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. भेसळ युक्त व निकृष्ट खाद्यपदार्थ विक्री होणार नाहीत याबाबत प्रशासनाने कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी ग्राहक पंचायत महाराष्ट्र बीड जिल्हा यांच्याकडून निवेदनाद्वारे निवेदनाद्वारे मा. जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे करण्यात आली होती. त्याची दखल प्रशासनाने तात्काळ घेऊन जिल्हात सणासुदीच्या काळात तपासणी मोहीम राबविण्यात आली होती. अन्न औषध प्रशासनाने त्या कालावधीत विविध एकूण (६३) नमुन्याची तपासणी केल्याचे पत्र बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र यांच्याकडे प्राप्त झाले आहे. त्यापैकी (५२) तपासणी अहवाल अद्याप पर्यंत तपासणीसाठी प्रलंबित आहेत. सदरील अहवाल प्राप्त होतात संबंधितावर आसुमाका कायद्या अंतर्गत कार्यवाही करण्यात येईल. त्यानंतर जानेवारी २०२६ मध्ये देखील कार्यवाही करण्यात येईल. आपल्या निवेदनानुसार कामकाज नियमितपणे करण्यात येत आहे. यापुढे देखील खाद्यपदार्थ यांची दरमहा तपासणी करण्यात येणार आहे असे मा. श्री अ. ज्ञा. भोसले अन्न सुरक्षा अधिकारी( अन्न औषध प्रशासन विभाग महाराष्ट्र शासन बीड) सहाय्यक आयुक्त यांनी शासकीय पत्रकाद्वारे कळविले आहे.

तरी जिल्ह्यातील सर्व खाद्यपदार्थ व दुग्ध पदार्थ, आधी पदार्थ विक्री करणाऱ्या सर्व दुकानदार यांनी भेसळ युक्त निकृष्ट खाद्यपदार्थ ग्राहकांना विक्री होणार नाही याबाबतची दक्षता घ्यावी असे आवहान बीड जिल्हा ग्राहक पंचायत उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी या पत्राद्वारे केले आहे.

---

# कलंबर बु येथील शेतकऱ्यांचा पाय घसरून विहिरीत पडून मृत्यू

**दैनिक वादळ वार्ता**
**लोहा । राजाराम फाजगे**

मौजे कलंबर बु. ता. लोहा येथील ५१ वर्षीय शेतकऱ्यांचा विद्युत पंप लावून विहीरीच्या कडेने जात असताना अचानक पाय घसरून विहिरीत पडून मृत्यू झाल्याची घटना १८ रोजी रविवारी सकाळी घडल्याने परिसरात दुःखदायक घटनेमुळे हळहळ व्यक्त होत आहे.



पोलिस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार , उस्माननगर पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या मौजे कलंबर बु. ता. लोहा येथील शेतकरी गंगाधर गणेश मैलारे वय ५१ वर्ष यांनी रोजच्या प्रमाणे शेतातील गहू हरभरा याना भिजण्यासाठी मोटार ( विद्युत पंप) चालू करण्यासाठी गेला असता, पाय घसरून विहिरीत तोल जाऊन पाण्यात पडून मरण पावल्याची घटना दि १८ जानेवारी सकाळी आठ वाजता च्या दरम्यान कळाले. परिसरात सध्या महावितरण कंपनी शेतकऱ्यांवर मेहेरबान झाली आहे. पूर्वी सात दिवस थ्री फिज दिवसा नाही तर रात्री विद्युत पुरवठा केला जात असे. पण अचानक वेळेत बदल करून कधी सकाळी तर कधी दुपारी स्फिट आदला बदल करून विद्युत पुरवठा केला जात असल्याने शेतकरी झोपेतून उठुन पाणी लावण्यासाठी धडपड सुरू असते. अचानक रविवारी सकाळी कलंबर बु. ता लोहा येथील शेतकरी गंगाधर गणेश मैलारे स्वतःच्या शेतात गहू , हरभरा याना पाणी देण्यासाठी विद्युत पंप चालू करण्यासाठी गेला असता पाय घसरून विहिरीत पडून मरण पावल्याची घटना घडली. याची माहिती उस्माननगर पोलिस स्टेशनला कळवली असता पोलिसांनी घटनास्थळी भेट देवून विहीरीच्या बाहेर पार्थिवदेह काढून प्राथमिक आरोग्य केंद्र उस्माननगर येथे पोस्टमार्टम करून नातेवाईकांना सुपूर्द करण्यात आले. रात्रौ उशिरा कलंबर येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. गंगाधर मैलारे यांच्या पश्चात आई , वडील , पत्नी , दोन मुली, एक मुलगी , भाऊ असा मोठा परिवार आहे. शेतकरी गंगाधर गणेश मैलारे यांच्या दुःखद घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

---

# मृदा संवर्धन ही काळाची गरज-डॉ.राजू शेख

**दैनिक वादळ वार्ता**
**नांदेड । प्रतिनिधी**

श्री गुरु बुद्धिस्वामी महाविद्यालय पूर्णा येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विशेष शिबिराचा आज दुसरा दिवस सकाळच्या सत्रामध्ये सर्व स्वयंसेवकांनी शाळेच्या परिसरात स्वच्छता करून शाळेचा परिसर सुंदर केला त्यानंतर राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिरात गतवर्षी लावलेल्या झाडांना पाणी देण्यासाठी त्यांना व्यवस्थित केले.



त्यानंतर दुसऱ्या बौद्धिक सत्रात डॉ. संजय दळवी, डॉ. अजय कुऱ्हे, डॉ. रविंद्र राख,डॉ.राजीव यशवंते, डॉ.पल्लवी चव्हाण, डॉ. सोमनाथ गुंजकर, डॉ. स्मिता जमदाडे, डॉ. जयश्री स्वामी डॉ. सुंदर जानराव, प्रा. रोहित पुपूलवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. राजू शेख यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन करतांना म्हटले कि... भू संरक्षण (मृदा संवर्धन) ही काळाची गरज आहे, कारण वाढती लोकसंख्या, हवामान बदल आणि प्रदूषणामुळे जमिनीची सुपीकता कमी होत आहे; यामुळे अन्नसुरक्षा धोक्यात येत असून, नैसर्गिक संसाधनांचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण, रासायनिक खतांचा वापर टाळणे आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे, जेणेकरून जमीन, पाणी आणि जंगल यांसारख्या नैसर्गिक संपत्तीचे रक्षण होऊन शाश्वत विकास साधता येईल. भू संरक्षण हे केवळ शेतीसाठीच नाही, तर संपूर्ण पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी आणि भविष्यातील पिढ्यांसाठी नैसर्गिक संसाधने टिकवून ठेवण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे.


कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. दैवशाला कामठाणे यांनी केले तर सूत्रसंचालन स्वयंसेविका प्रेरणा धुतराज यांनी केले तर आभार प्रदर्शन अबोली सोनुले यांनी केले.विशेष शिबिराला स्वयंसेवकांची उपस्थिती मोठया प्रमाणात होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रमाधिकारी डॉ. राजू शेख, कार्यक्रमाधिकारी डॉ. दैवशाला कामठाणे श्री नागोराव साळवे, श्री मंचक वळसे यांनी मेहनत घेतली.

---

# दरेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पालक मेळावा अति उत्साहात संपन्न

**लोकन्याय न्युज नेटवर्क**
**मुदखेड । प्रतिनिधी**

मुदखेड तालुक्यातील दरेगाव येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वतीने पालक मेळाव्याचे आयोजन दि.१७ जानेवारी रोजी करण्यात आले होते.विद्यार्थी दशेत लहान-लहान विद्यार्थी शिकत असताना खुप साऱ्या अडचणी असतात पण विद्यार्थी हे भौतिक,शैक्षणिक वातावरणात घडत असतात.बालवयात विद्यार्थी हे मातीच्या चिखलासारखे असतात. त्यांना योग्य वळण मिळाल्यास ते आपल्या आई वडिलांचे स्वप्न सत्यात ऊतरवू शकतात. शिक्षक हे विद्यार्थींना शाळेच्या वेळेत शिकविन्या बरोबरच योग्य वळण आणि मार्गदर्शन करण्याचे काम करतात.तर विद्यार्थ्यांच्या पालकांनी सुद्धा आपला विद्यार्थी किती अभ्यास करतो,त्याची अभ्यासाच्या बाबतीत प्रगती कशी आहे. तो अभ्यास करतो की नाही याची शाळेत जाऊन चौकशी करणे. वेळोवेळी विचारणा केल्याने विद्यार्थींची अडचण लक्षात येते आणि अडचणीवर





मात करता येते याचाच एक भाग म्हणून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आणि शालेय व्यवथापन समितीच्या यांच्या समन्वयाने पालक मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्यामध्ये पालकांनी आपल्या पाल्याला दररोज शाळेत पाठवणे आणि आपल्या पाल्याचा अभ्यास घरी घेणे.या मेळाव्याच्या माध्यमातून सर यांनी शाळेच्या विविध अडचणी पालकांसमोर व्यक्त केल्या. तर पालकांनी सुद्धा आपण भौतिक सुविधासाठी लोकवर्गणी च्या माध्यमातुन हातभार लावु असे सांगितले.शिक्षकांनी शासनाच्या विविध योजनाची माहिती दिली. या पालक मेळाव्याला शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष देविदास शिंदे, सरपंच सौ.अनुसया जकोजी माचनवाड,गजानन गाढे, विठ्ठल शिंदे,सुनील एडके, पप्पू कोलते, केरबा कोलते,आनंदा कोलते, रमेश गाढे ,वसंत शिंदे ,किशन नरवाडे, सिध्दार्थ कोलते ,जकोजी माचनवाड , श्रीराम माचनवाड,पंढरीनाथ माचनवाड, सुधिर शिंदे, गोविंद गाढे,साहेबराव कोलते, तातेराव गाढे,बालाजी गाढे,भगवान राहेरे,संजय नरवाडे,नागोराव पांचाळ,बाबू कोलते,केशव शिंदे,तसेच माता पालक शिल्पा शिंदे ,विशाखा शिंदे सुनीताबाई कोलते, सुरेखा शिंदे,अस्मिता शिंदे, अंजनाबाई कुरे,गोदावरी नरवाडे, गण्याबाई नरवाडे, सुरेखा अक्कलवाड, गजराबाई गाढे, अनुसयाबाई कोलते, वर्षा कोलते, शिल्पा कोलते,व शाळेचे शिक्षक राऊत सर,कांबळे मॅडम,मंगनाळे मॅडम,मनुरकर सर, कुसुंमकर सर, जाधव सर व गावातील प्रतिष्ठित नागरिक, माता पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री जाधव सर यांनी केले.

# शेवडी बा.येथे 'वैशालीपर्व' ग्रंथाचे अनौपचारिक संपादकीय विमोचन

दैनिक वादळ वार्ता

**लोहा | राजकुमार पिल्लोळे**

लोहा तालुक्यातील मौजे शेवडी बा. येथे कै. वैशालीताई मनोहर धोंडे यांच्या जयंतीदिनी दि. १७ जानेवारी २०२६ रोजी स्मृती मंदिरात 'वैशालीपर्व' या ग्रंथाचे अनौपचारिक संपादकीय विमोचन पार पडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवा संघटनेचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष व सेवा जनशक्ती पार्टीचे पक्षप्रमुख धर्मात्मा प्रा. मनोहर धोंडे होते.

यावेळी मुख्य संपादक अभय कल्लावार उद्घाटक म्हणून उपस्थित होते. तसेच समन्वयक विठ्ठलराव ताकबिडे, संजय कोठाळे, सेवा जनशक्ती पार्टीचे नगरसेवक मयूर नळदकर, प्रकाशक दत्ता डांगे, माजी सरपंच कैलास धोंडे, लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक बसवेश्वर धोंडे, शिवा कर्मचारी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर घोडके आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात कै. वैशालीताई मनोहर धोंडे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली. त्यानंतर 'वैशालीपर्व' ग्रंथाचे अनौपचारिक संपादकीय विमोचन करण्यात आले.

यावेळी बोलताना धर्मात्मा प्रा. मनोहर धोंडे म्हणाले की, 'वैशालीपर्व' या ग्रंथाची रचनात्मक मांडणी मुख्य संपादक अभय कल्लावार यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण व दर्जेदार केली आहे. या ग्रंथास महाराष्ट्रातील अनेक मंत्री, आमदार व मान्यवरांचे अभिप्राय लाभले आहेत. ग्रंथाचे काम पूर्ण झाल्यानंतर त्याचा मुख्य प्रकाशन सोहळा मुंबई येथे महात्मा बसवेश्वर महाराज जयंती पंधरवड्याच्या शेवटच्या दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार असून हा ग्रंथ महाराष्ट्रातील सर्व वाचनालये व ग्रंथालयांना मोफत दिला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी उद्घाटक अभय कल्लावार म्हणाले की, 'वैशालीपर्व' हा ग्रंथ महिलांसाठी आदर्श व प्रेरणादायी ठरणार आहे. कै. वैशालीताई मनोहर धोंडे यांच्या जीवनकार्यावर आधारित हा ग्रंथ असून आज त्यांच्या जयंतीदिनी या ग्रंथाची पूजा व्हावी या हेतूने हा छोटेखानी विमोचन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. तसेच ज्यांना वैशालीताई यांच्या जीवनावर आधारित लेख लिहायचे आहेत किंवा लिहिलेले आहेत त्यांनी ते माझ्याकडे द्यावेत, असे आवाहनही त्यांनी केले.



## श्याम विद्यालय दहिफळ वडमाऊली येथे हळदी कुंकवाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**केज | प्रतिनिधी**

केज तालुक्यातील दहिफळ वडमाऊली येथील शाम विद्यालय, श्याम कनिष्ठ महा विद्यालय व श्याम गदळे कला विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात प्राचार्या सौ.जयश्री शरद गदळे यांच्या नेतृत्वाखाली हळदी कुंकवाचा कार्यक्रम संपन्न झाला.याविषयी सविस्तर माहिती अशी की,शाळा हे समाजाचे एक प्रतिबिंब आहे समाज आणि शाळा यांचा सह संबंध आहे शाळेचे आणि समाजाच्या संबंधाचे, ऋणानुबंधाचे दृढीकरण व्हावे,वृद्धीकरण व्हावे, माता पालकांची जवळून चौकशी करता यावी आपल्या संस्कृतीचे, परंपरेचे,रूढीचे व चालीरीतीचे संवर्धन व्हावे जतन व्हावे हा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून प्राचार्या सौ.गदळे मॅडम यांनी सदरील कार्यक्रमाचे आयोजन केले होते. याप्रसंगी अनेक महिलांनी गीतगायन,अभंग,गवळणी गायन केले आणि कार्यक्रमात रस उत्पत्ती केली.यावेळी परिसरातील महिला भगिनी मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्या होत्या.कार्यक्रम यशस्वी




करण्यासाठी श्रीमती सुनंदा कुलकर्णी, श्रीमती इंदुमती ठोंबरे, श्रीमती मनीषा कदम व श्रीमती धनश्री मेहत्रे सह शाम विद्यालय शाम कनिष्ठ महाविद्यालय व श्याम गदळे कला विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले अशी माहिती प्रसार माध्यमांना मा.सरपंच तात्यासाहेब डोईफोडे सर यांनी दिली आहे.


## बीड तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानदार यांना वेळेवर धान्य वितरण होत नाही :विशाल इंगोले

दैनिक वादळ वार्ता

**बीड प्रतिनिधी ;**

केंद्र सरकार च्या वतिने स्वस्त धान्य दुकाना मार्फत पंतप्रधान गरिब कुटुंब कल्याण योजने अंतर्गत मोफत धान्य दिले जाते परंतु सध्या बीड पुरवठा विभागाचा कारभार का हम करे सो कायदा प्रमाणे चालत आहे एक तर दुकानदार यांना ३ महिन्याच्या ट्रांजेक्षण प्रमाणे धान्य दिले जाते तर नियतन काढण्यासाठी ऐवढा वेळ काढू पणा का केला जातो परमिट सुद्धा वेळेवर तयार केले जात नाही दर महिन्याला २/३ तारखेला परमिट गोदाम ला पाठवले जातात त्या नंतर गोदाम व्यवस्थापक व वाहतूक व्यवस्था पुरवणारे कंत्राट दार हे आपल्या सवडीने दुकानदार यांना धान्य वाटप करण्यासाठी गाड्या उपलब्ध करून धान्य वितरण करतात ही पुर्ण प्रक्रिया करण्यासाठी दर महिन्याला अनेक दुकानदार यांना धान्य हे २५/२८ तारखेपर्यंत दुकानात पोहच होते परिणामी दुकानदार यांच्या कडे धान्य वाटप करण्यासाठी पुरेसा वेळ नसतो त्यात मशिन सर्व्हर डाऊन होते परिणामी पुरवठा विभाग मुदतवाढ देण्यात यावी यासाठी जास्त मणावर घेत नाही किंवा शासनास पत्र व्यवहार करत नाही या मुळे मुदतवाढ न आल्याने १ तारिख ऊजडली कि मशिन बंद होऊन मागिल महिन्याचे धान्य लैप्स होऊन पुढील महीन्याचे धान्य वितरणासाठी डाटा ऐतो गेल्या ४/५ महिन्यांपासून अनेक कार्ड धारक हे धान्य घेण्यापासून वंचित राहत आहेत या वर मा.जिल्हाधीकारी साहेब यांनी तातडीने ठोस उपाययोजना करून कार्यवाही करावी अशी मागणी शिवक्रांती सेना संघटनेचे बीड जिल्हा अध्यक्ष विशाल इंगोले यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

## माजी विद्यार्थ्यांच्या सहकार्याने तळोदा तालुक्यात जि.प. शाळांचा कायापालट



दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार | दिपक गोसावी**

महाराष्ट्र शासनाच्या पुढाकाराने तळोदा तालुक्यात 'आठवणींमधून कृतज्ञतेकडे' हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत असून माजी विद्यार्थ्यांच्या सहकार्यामुळे जिल्हा परिषद शाळांचा कायापालट होताना दिसत आहे. ज्या शाळांनी विद्यार्थ्यांचे भविष्य घडवले, त्या शाळांसाठी माजी विद्यार्थी पुढे येत असल्याने शिक्षणव्यवस्थेला नवी दिशा मिळत आहे. शालेय शिक्षण विभागाच्या निर्णयानुसार माजी विद्यार्थी संघ स्थापन करण्याच्या सूचनेनंतर जिल्हा प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम प्रभावीपणे राबविला जात आहे. गटशिक्षणाधिकारी शेखर धनगर यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यातील अनेक शाळांमध्ये माजी विद्यार्थ्यांनी संगणक, शैक्षणिक साहित्य, क्रीडासाहित्य तसेच विविध भौतिक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

या उपक्रमामुळे शाळांमधील शैक्षणिक वातावरण अधिक समृद्ध झाले असून शिक्षकांचे मनोबल वाढले आहे. विद्यार्थ्यांना आधुनिक सुविधा मिळू लागल्याने शिक्षणाची गुणवत्ता उंचावत आहे. 'आठवणींमधून कृतज्ञतेकडे' हा उपक्रम आता लोकचळवळीचे स्वरूप घेत असून तळोदा तालुक्याचा हा प्रयोग राज्यासाठी आदर्श ठरत आहे.

## जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ शाळेत तिळगुळ कार्यक्रम संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**केज | प्रतिनिधी**

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची ता.केज या शाळेत तिळगुळ कार्यक्रम संपन्न झाला.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ शाळेचे अपग्रेड मुख्याध्यापक श्री. राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी केले.दि.१४ जानेवारी रोजी सुर्य धनु राशीतुन मकर राशीत प्रवेश करतो.तिळामुळे शरीरात तैलग्रंथी निर्माण होऊन थंडीपासून बचाव करण्यासाठी उपयोग होतो.तिळामध्ये सेसमिन आणि सेसमोलिन हे दोन सर्वात महत्त्वाची संयुगे असतात.जी कर्करोगाच्या पेशी वाढण्यास प्रतिबंध करतात. हृदयविकाराचा धोका कमी होतो.तिळगुळ खाल्ल्याने शरीरात लोह वाढते.शरीरात जमा झालेले खराब कोलेस्ट्रॉल कमी करतात अशी माहिती आपल्या प्रास्ताविकात श्री. राजाभाऊ दत्तात्रय कदम अपग्रेड मुख्याध्यापक यांनी सांगितली.या शाळे तील प्राथमिक पदवीधर



शिक्षक डॉ.रामकिशन ग्यानबा मुळे सर,श्री. संदीप मेघराज ठोंबरे सर, श्री.राहुल बजरंग बचुटे सर,श्री.आकाश दत्तात्रय लोंढे सर,श्री.आबासाहेब तुळशिराम धपाटे सर, श्रीमती अंजली गोविंदराव उटीकर मॅडम,श्रीमती निलावती अनिलकुमार भोरे मॅडम,ट्रेनी शिक्षिका रोहिणी श्रीधर काळे मॅडम यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.तिळगुळ शिक्षक,विद्यार्थी व विद्यार्थिनींना उपस्थित गावकरी,महिला,पीएम पोषण शक्ती निर्माण योजना कामगार स्वर्णमाला पवार व अनिता पवार या सर्वांना वाटप करण्यात आले.या दिवशी शाळेत व परिसरात स्वच्छतेचा उपक्रम राबविण्यात आला.शाळेत व परिसरात स्वच्छता करण्यात आली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री.आकाश दत्तात्रय लोंढे सर यांनी केले.श्री.राहुल बजरंग बचुटे सर यांनी आभार मानले.

## स्वच्छ, सुंदर व गुणवत्तापूर्ण पर्यावरणपूरक सोनखेडची जि.प.केंद्रीय प्राथमिक व कन्या शाळा

दैनिक वादळ वार्ता

**लोहा | राजकुमार पिल्लोळे**

लोहा-नांदेड राष्ट्रीय महामार्गावर वसलेल्या सोनखेड येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक व कन्या शाळा ही स्वच्छता, सौंदर्य, गुणवत्ता व पर्यावरणपूरक उपक्रमांमुळे तालुक्यात आदर्श ठरत आहे. मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा योजनेअंतर्गत योग्य व पारदर्शक गुणांकन झाले तर नांदेड जिल्ह्यात ही शाळा प्रथम क्रमांक पटकावेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

दि. १७ जानेवारी रोजी लोहा तालुका पत्रकार संघाच्या वतीने शाळेची पाहणी करण्यात आली. यावेळी सोनखेडचे उपसरपंच सुनील मोरे, मुख्याध्यापिका सौ. कविता मुदखेडे, सहशिक्षक अनिल चिद्रावर, आर. बी. किडे, सौ. विद्या मॅडम तसेच विद्यार्थी उपस्थित होते.पाहणीत शाळेचा परिसर अत्यंत स्वच्छ व सुबक आढळून आला. शाळेच्या व्हरांड्यात पेव्हर ब्लॉक बसविण्यात आले असून प्रवेशद्वाराजवळ हिरवागार बगीचा, फुलझाडे व हरळीने परिसर नटलेला आहे.



विद्यार्थ्यांसाठी शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय, स्वतंत्र स्वच्छतागृहे, तसेच अभ्यासासाठी सुसज्ज ग्रंथालय उभारण्यात आले आहे.

पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण, परसबाग, प्लास्टिकमुक्त शाळा, ओला-सुका कचरा वर्गीकरण, कंपोस्ट खत निर्मितीचे हौद अशी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी भव्य स्टेज व विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासासाठी खेळाचे मैदान उपलब्ध आहे.

मुख्याध्यापिका सौ. कविता मुदखेडे या सुट्टीच्या दिवशीही शाळेत येऊन विविध उपक्रम राबवितात. शिक्षक, पालक, ग्रामस्थ व लोकप्रतिनिधी यांच्या सहकार्यामुळे शाळा सर्वांचीच असल्याची भावना निर्माण झाली आहे. सोनखेडची ही जिल्हा परिषद शाळा आज स्वच्छ, सुंदर व गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा आदर्श ठरत आहे.

## अक्कलकुवा तालुक्यात महसूल विभागाचा विस्कळीत कारभार

## अधिकारी-मंडळ अधिकारी अपडाऊनवर,तलाठी सजा कार्यालयाऐवजी तालुक्यातूनच कारभार

दैनिक वादळ वार्ता

**रवींद्र वळवी मोलगी | प्रतिनिधी**

अक्कलकुवा तालुका हा जिल्ह्यातील अत्यंत दुर्गम,डोंगराळ व आदिवासीबहुल भाग म्हणून ओळखला जातो. शासनाकडून अशा भागात काम करण्यासाठी महसूल विभागातील अधिकारी, मंडळ अधिकारी व तलाठी यांना विशेष प्राधान्य, भत्ते व सुविधा दिल्या जातात, जेणेकरून स्थानिक आदिवासी जनतेला शासकीय सेवा त्यांच्या गावाजवळ, वेळेत आणि सुलभपणे मिळाव्यात. मात्र प्रत्यक्षात तालुक्यातील प्रशासनिक चित्र अत्यंत चिंताजनक असल्याचे दिसून येत आहे.

तालुक्यातील अनेक महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी हे




मुख्यालयी नियमित उपस्थित न राहता नंदुरबार व शहादा येथून दररोज उपडाऊन करीत असल्याची बाब उघडकीस येत आहे. त्यात भर म्हणून, तालुक्यातील बहुतांश तलाठी आपल्या नियुक्त सजा कार्यालयात न जाता थेट अक्कलकुवा तालुक्याच्या ठिकाणी बसूनच संपूर्ण सजा कारभार चालवत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

तलाठी हे सजा कार्यालयात उपस्थित राहून गावपातळीवर महसूलविषयक सेवा देणे अपेक्षित असते. मात्र प्रत्यक्षात अनेक सजा कार्यालये बंद अथवा ओस पडलेली दिसतात. त्यामुळे दुर्गम गावपाड्यांतील नागरिकांना साध्या दाखल्यांसाठी किंवा शासकीय योजनांच्या कामांसाठी थेट अक्कलकुवा येथे यावे लागते. वाहतुकीची अपुरी साधने, डोंगराळ रस्ते, आर्थिक परिस्थिती आणि रोजंदारीवर अवलंबून असलेले जीवनमान लक्षात घेता, हा प्रवास आदिवासी नागरिकांसाठी मोठे ओझे ठरत आहे. अनेकदा कार्यालयात पोहोचल्यानंतरही मंडळ अधिकारी नाहीत, साहेब व्हिजिटला गेले आहेत,आप्पा अक्कलकुवाला भेटतील अशी उत्तरे मिळाल्याने त्यांची निराशा अधिकच वाढते.

## परमार्थ केल्याने सुख,समाधान प्राप्त होते-मा.आ.केशवराव आंधळे



दैनिक वादळ वार्ता

**केज | प्रतिनिधी**

दि.१९ जानेवारी २०२६ रोजी केज तालुक्यातील जीवाचीवाडी येथुन प्रथमच जीवाचीवाडी ते पंढरपुर पायी दिंडी सोहळा प्रारंभ सुरू करण्यात आला.या दिंडीला निरोप देण्यात आला.या कार्यक्रमासाठी प्रमुखपाहुणे म्हणुन माजी आमदार श्री.केशवराव दादा आंधळे म्हणाले की, यावर्षी प्रथमच जीवाची वाडी ते पंढरपुर पायी दिंडी सोहळा सुरू होत आहे.मनुष्याने परमार्थ केला तर खरोखरच सुख आणि समाधान मिळते. स्वातंत्र्य सैनिक कै. भगवान काळे यांच्या आत्म्यास खरोखरच शांती लाभेल असे धार्मिक उल्लेखनीय कार्य त्यांचे तिन्ही चिरंजीव पद्माकर, आण्णासाहेब व नामदेव यांनी केले आहे.यावेळी ह.भ.प.श्री.जालींदर महाराज नेहरकर यांच्या किर्तनाचे आयोजन केलेले असुन या सुवर्ण संधीचा भावीकांनी लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.काळे कुटूंब व ग्रामस्थांनी माजी आमदार केशवराव दादा आंधळे यांचा हृदय सत्कार करून त्यांचे आभार मानले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077